# लाल निशाण पक्षाच्या ट्रेड युनियन आघाडीचे निवेदन

कामगार संघटना संयुक्त कृति समितीच्या निमंत्रक समितीने ११ ऑक्टोबरच्या महाराष्ट्र राज्यव्यापी सार्वत्रिक संपाची हाक रद्द केली ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. निमंत्रक समितीचा हा निर्णय राज्यभरच्या सर्व धंद्यातील कार्यकर्त्यांना धक्का देणारा आहे. या माघारीच्या निर्णयातून ट्रेड युनियन चळवळीतील विशेषत: नेतृत्वाच्या पातळीवरील कमकुवतपणा ठळकपणे व्यक्त होतो. संघटनात्मक कमकुवतपणाची ही परिस्थिती ट्रेड युनियन चळवळीच्या पायाभूत असलेल्या कामगार, कर्मचारी, ग्रामीण श्रमिक कार्यकर्त्यांनी गंभीरपणे ध्यानात घेतली पाहिजे व ही परिस्थिती बदलण्यासाठी स्वत: क्रियाशील झाले पाहिजे.

महागाई भडकवणारे सरकारचे आर्थिक धोरण, भांडवलदार वर्गाचे बेछूट वर्तन, एकंदरीने शासनाचा कामगारविरोधी रोख व दडपशाहीचे धोरण याविरुद्ध निषेध निदर्शन करण्यासाठी, श्रमिक विरोधी शक्तींना बजावण्यासाठी व कामगार वर्गाच्या राज्यभरच्या शक्तींना जागृत, संघटित व संकलित होण्यास चालना देण्यासाठी हे राज्यव्यापी संपनिदर्शन इंटकव्यतिरिक्त सर्व ट्रेड युनियन संघटनांनी योजले होते. ११ ऑक्टोबर सार्वत्रिक संपाच्या हाकेला प्रतिसाद वाढत होता. संप संघटित करण्यात जातीने पुढाकार घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बैठकांना उपस्थिती वाढत होती. शासकीय कर्मचारी व बेस्टचे कर्मचारी यासारखे कांही विभाग त्यांच्या स्वत:च्या जाणीवेच्या व संघटनात्मक परिस्थितीमुळे या कृतित सामील होण्यात कांही अडथळे होते तरी कापड धंद्यासकट इतर सर्व उद्योगात ११ ऑक्टोबरच्या घोषणेची वाढती साथ होत होती. या निदर्शनाच्या तयारीच्या क्रमात ठाण्याला व धुळे जिल्ह्यात शहादा येथे पोलीसांनी कामगार शेतमजूरांवर निघृण दडपशाही केली, पण त्यापुढे दबून न जाता उलट अधिक जोरकस व मोठ्या संख्येने निदर्शने करून श्रमिक समुदायांनी दडपशाहीस प्रत्युत्तर दिले व ११ ऑक्टोबरची तयारी अधिक जोमाने चालू ठेवली. मुंबईच्या माध्यमिक शिक्षक संघटनेने शिक्षण संस्थांना ११ ऑक्टोबरला सार्वत्रिक संप आहे हे लक्षात घेऊन परिक्षांचा कार्यक्रम ठरविण्याच्या सूचना दिल्या.या पार्श्वभूमिवर ११ ऑक्टोबरचे संपनिदर्शन रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्यातील श्रमिक आंदोलनाच्या पुढे चाललेल्या चालीला खळसा देणारा ठरत आहे.

कामगार संघटना संयुक्त कृति समितीची स्थापना व राज्यव्यापी सार्वत्रिक संप करण्याचा निर्णय, देशातील बिघडणाऱ्या आर्थिक राजकिय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कामगार वर्गाने आपल्या संघटित सामर्थ्याने या परिस्थितीत हस्तक्षेप केला पाहिजे या भूमिकेतून पुढे आला होता. निवडणुका जाहीर झाल्यानंतर सुद्धा कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी कामगार वर्गाला स्वत:चे संघटित सामर्थ्य वाढवून लढावेच लागणार,या कामगार कार्यकर्त्यांच्या मनात सार्वत्रिक असलेल्या विचाराने त्या निर्णयाला ठामपणा

...२

आला होता. ट्रेड युनियन संघटनांच्या पुढा-यांनी परिस्थितीची गरज ओळखून संपनिदर्शनाची हाक दिली होती व हे संपनिदर्शने कामगार समुदायांच्या स्वतःच्या जागृतीची व सिध्दतेची एकप्रकारे चाचणी ठरत असते. परंतु निवडणुका जाहीर झाल्या नंतर निवडणुकांच्या राजकारणाची व्यग्रता नेतृत्वाला ग्रासू लागली आणि हे पाऊल यशस्वी करण्याचेबाबतीतील त्यांचे लक्षच ढिले झाले असे म्हणणे भाग आहे. त्यामुळे हा वळसा पडत आहे. निमंत्रक समितीने अधिक तयारीसाठी अवधी घेतला असता तरी समजण्यासारखे होते. परंतु सार्वत्रिक संपाची हाक रद्द करण्याची भूमिका घेतली यामधून या निर्णयामागचा विचार स्पष्ट होतो.

शासनाचे आर्थिक धोरण आणि एकंदरीने कामगारविरोधी व दडपशाहीचे धोरण यामध्ये निवडणुकांच्या निकालातून कांहीही इष्ट जनताभिमुख फरक पडणार नाही हे प्रत्येकाला उघड दिसत आहे. स्थिर राज्य निर्माण करण्याचेही सामर्थ्य राज्यकर्त्या वर्गाच्या कोणत्याही पक्षात नाही हेही तितकेच उघड आहे. श्रमिकांना स्वतःलाच संघटित होऊन, स्थानिक, राज्यव्यापी व देशव्यापी प्रमाणावर आपले संघटित सामर्थ्य संकलित व एकसूत्रित करून, जागृत व राजकियदृष्टया जाणते होऊन स्वतःच्या जीवनाच्या रक्षणासाठी व देशाची आर्थिक राजकिय सूत्रे स्वतःच्या हातात घेण्यासाठी सिध्द व्हावे लागणार आहे. या दिशेने देशातील बिघडती परिस्थिती रेटते आहे. परिस्थितीचे हे आव्हान स्वीकारण्याचे निशाण एकप्रकारे महाराष्ट्रातील कामगार वर्ग शहरांतूनच नव्हे तर खेडयापाडयातून, साखर कारखाने, मळे, रोजगारहमीची कामे या सर्वापर्यंत उभारणार होता. परिस्थितीत आव्हान तसेच तेवते रहाणार आहे. महाराष्ट्रातील ट्रेड युनियन पातळीवर आपआपल्या कामाच्या जागी संघटित असलेला जवळजवळ सर्व धंद्यातील शारिरीक व बौध्दिक श्रमिक त्या आव्हानाकडे कानाडोळा करू शकत नाही किंवा ते आव्हान टाळू शकत नाही. ते आव्हान स्वीकारण्यासाठी स्वतःची सिध्दता केलीच पाहिजे. आपल्यातील तसेच आपल्या पुढारीपणातील उणीवा दूर करून कामगार वर्गाच्या वर्गीय एकजूटीला बळकटी आणण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. आपल्या जीवनाचे रक्षण करण्यासाठी व आपलेजीवन सुधारण्यासाठी भांडवलदारवर्गाच्या मुजोरीवर व शासनाच्या शोषणधार्जिणेपणावर, कामगारविरोधी वृत्तीवर, भ्रष्टाचार दप्तरदिरंगाईवर मात करू शकणारे, श्रमिक जनतेचा प्रत्यक्ष अधिकार प्रस्थापित करू शकणारे सामर्थ्य ठिकठिकाणी, व संबंध राज्यपातळीवर उभे करण्यासाठी कामगारांनी व कामगारांतील पुढारलेल्या विभागानी झपाटयाने पावले उचलली पाहिजेत . देशातील अरिष्ट परिस्थिती मौलिक परिवर्तनाची मागणी करत असताना कामगारवर्गादी कष्टकरी शक्तींनी पुढाकार घेण्याची सिध्दता केली नाही तर प्रतिक्रांती देशाच्या मानगुटीला बसते हा धडा लक्षात ठेवून आपल्या हालचालींचा वेग कामगार, ग्रामीण गरीबादी कष्टक-यांनी वाढविला पाहिजे.

राज्यव्यापी सार्वत्रिक संपाच्या घोषणेचा विजय असो.
सार्वत्रिक संपाची तयारी चालू ठेवा व पक्की तारीख ठरविण्यासाठी राज्यव्यापी परिषद संघटित करा. या प्रकारच्या आंदोलन उभारणीच्या मार्गातील वैचारीक संघटनात्मक अडथळे दूर करा. संसदीय निवडणुकामुळे आपली वर्गीय एकजूट विस्कळीत होऊ देऊ नका.

00000